नि. दि.दा.क्र. २६९/२००५
आण्णासाहेब वि. प्रताप वगैरे

**आदेश निशाणी ३१ वर**
( दिनांक ३०—१०—२०१५)

१. वादीने प्रस्तुत अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अंतर्गत वादपत्रात संभाव्य दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील प्रतिवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे वादीचा लेखी युक्तीवाद व दोन्ही बाजुचा तोंडी युक्तीवाद विचारात घ ेतला. वादीचा तात्पुरता मनाई हुकुम अर्ज नि.क्रं. ५ हा या न्यायालयाने व मा. जिल्हा न्यायालयाने नामंजुर केल्यानंतर त्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्रं. १ ने अनाधिकाराने वाद मिळकतीचा ताबा घेतला आहे. प्रस्तुत दावा न्यायप्रविष्ठ असताना प्रतिवादी क्रं. १ यांनी वाद मिळकतीचा कब्जा घेतल्याने त्या अनुषंगाने दाव्यात संभाव्य अनुषंगीक दुरूस्ती करण्याबाबत वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. याउलट, संभाव्य दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात बदल होणार असल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची प्रतिवादीने विनंती केली आहे.

३. यामध्ये वाद नाही की, प्रस्तुत दावा हा निरंतर मनाई हुकुमाकरिता दाखल केला आहे. मात्र, प्रस्तुत दावा न्यायप्रविष्ट असताना प्रतिवादी क्रं. १ ने अनाधिकाराने वाद मिळकतीचा ताबा घेतला असल्यामुळे तो ताबा परत मिळविण्याच्या अनुषंगाने वादी संभाव्य दुरूस्ती करू ईच्छित आहे. सदर संभाव्य दुरूस्ती ही प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर वाद मिळकतीच्या ताब्याबाबत झालेल्या पुढील बदलामुळे करावी लागत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर संभाव्य दुरूस्ती ही अनुषंगीक स्वरूपाची आहे. संभाव्य दुरूस्ती करण्यास वादीस परवानगी दिल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे दाव्याची वाढती संख्या टाळण्याकरीता वादीला संभाव्य दुरूस्ती करण्यास परवानगी देणे योग्य व संयुक्तीक आहे. करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज निशाणी ३१ हा रू. २००/— खर्च लावुन मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदर दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करावी.

दि. ३०—१०—२०१५

( सि.ना.गोडबोले )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माढा

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A. G. Kulkarni ( L.G.) |
| Court | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha |
| Date | :- | 30 /10 /2015 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 30 /10 /2015 |
| Order uploaded on | :- | 30 /10 /2015 |